फळबाग

# अंजीर लागवड मिळवून देईल नफा



प्रा. दर्शना मोरे
(मो.नं. ९६८९२१७७९०)
प्रा. पल्लवी घुले
क.का. वाघ. उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक



उष्ण तसेच कोरडे हवामान अंजिराला चांगले मानवते. त्यामुळे महाराष्ट्रात हे फळ आणखी मोठ्या क्षेत्रात करायला भरपूर वाव आहे. कमी उष्ण तापमान देखील या पिकाला घातक ठरत नाही; ओलसर दमट हवामान मात्र निश्चितपणे घातक ठरते. कमी पावसाच्या भागात जिथे ऑक्टोबर ते मार्चपर्यंत पाण्याची थोडीफार सोय आहे अशा ठिकाणी अंजीर लागवडीस वाव आहे. अगदी हलक्या माळरानापासून मध्यम काळ्या व तांबड्या जमिनीपर्यंत अंजीर लागवड शक्य आहे.

अंजीर हे फळ ताजे व सुके अशा दोन्ही प्रकारांमध्ये बाजारात मिळते. अंजीर हे कमी पाण्यावर येणारे काटक फळझाड आहे. अलीकडे सोलापूर-उस्मानाबाद येथे अंजिराची लागवड शेतकरी करू लागले आहेत. त्यावरुन अंजीर हे सर्व दुष्काळी भागात उत्तम होईल असे म्हणायला हरकत नाही.

अंजीर हे पोषणदृष्ट्या एक उत्तम फळ आहे तसेच ते औषधी आहे. ताज्या अंजिरात १० ते २८ टक्के साखर असते. त्यातून चुना, लोह तसेच अ आणि क जीवनसत्त्वे यांचा चांगला पुरवठा होतो. अंजीर हे सौम्य रेचक असून शक्तिवर्धक, पित्तनाशक व रक्तशुध्दी करणारे असल्यामुळे इतर फळांपेक्षा अधिक मौल्यवान समजले जाते. दम्यावरही त्याचा अतिशय उपयोग होतो.



**हवामान** : उष्ण तसेच कोरडे हवामान अंजिराला चांगले मानवते. त्यामुळे महाराष्ट्रात हे फळ आणखी मोठ्या क्षेत्रात करायला भरपूर वाव आहे. कमी उष्ण तापमान देखील या पिकाला घातक ठरत नाही; ओलसर दमट हवामान मात्र निश्चितपणे घातक ठरते. कमी पावसाच्या भागात जिथे ऑक्टोबर ते मार्चपर्यंत पाण्याची थोडीफार सोय आहे अशा ठिकाणी अंजीर लागवडीस वाव आहे.

**जमीन** : अगदी हलक्या माळरानापासून मध्यम काळ्या व तांबड्या जमिनीपर्यंत अंजीर लागवड शक्य आहे. भरपूर चुनखडी असलेल्या तांबूस काळ्या जमिनीत अंजीर उत्तम वाढते. चांगला निचरा असलेली एक मीटरपर्यंत खोल असलेली कसदार जमीन अंजिरासाठी उत्तम होय. मात्र या जमिनीत चुन्याचे प्रमाण असावे. खूप काळ्या मातीची जमीन या फळझाडाला अयोग्य असते. खोलगट आणि निचरा नसलेल्या जमिनीत हे झाड पाहिजे तसे चांगले वाढत नाही.

**सुधारित जाती** : अंजिरात अनेक जाती आहेत. त्यात सिमरन, कालिमिरना, कडोटा, काबूल, मार्सेल्सश, (व्हाईट सॅन पेट्रो) आदी जाती प्रसिध्द आहेत. पुणे भागातील पूना अंजीर नावाने प्रसिध्द असलेली जात (ॲड्रिॲटिक) किंवा कॉमन या प्रकारातील असून महाराष्ट्रात मुख्यतः हीच जात लावली जाते.

**अभिवृध्दी किंवा रोप तयार करणे** : अंजिराची अभिवृध्दी फाटे कलमाने केली जाते. खात्रीच्या बागायतदाराच्या रोगमुक्त बागेतील जोमदार वाढीची झाडे निवडून नंतर त्यातून उत्तम व दर्जेदार फळे देणारी झाडे निवडतात व अशा झाडावरील १.२५ सें.मी. जाडीच्या आठ ते बारा फांद्या कलमासाठी निवडतात. लावण्यासाठी फाटे करताना फांदीचा तळाचा भाग व शेंड्याकडील कोवळा भाग छाटून टाकावा व मधला भाग रोपे तयार करण्यासाठी वापरावा.

फाटे कलम तीस ते चाळीस सें.मी. लांब असावेत. त्यावर किमान चार ते सहा फुगीर व निरोगी डोळे असावेत. कलमांचा तळाचा काप डोळ्याच्या खाली घ्यावा आणि वरचा काप डोळ्याच्या वर अर्धा सें.मी. जागा सोडून घ्यावा. दोन्ही काप गोलाकार घ्यावेत. फाटे कलम गादी वाफ्यावर ३० ु ÷ ३० सें.मी.वर किंवा दोन डोळे मातीत जातील अशी लावावीत. कलमे किंचित तिरपी करावीत. लावण्यापूर्वी कलमाच्या बुडांना आय.बी.जे. किंवा सिरेडिक्स यासारखे एखादे मूळ

फोडणारे संजीवक लावले तर मुळ्या लवकर फुटतात.

**लागवड** : पावसाळ्यापूर्वी मे महिन्यात ५ × ५ मीटर अंतरावर ०.६० × ०.६० × ०.६० मीटरचे खड्डे घ्यावेत. शिफारस केलेल्या अंतरानुसार अंजीर फळपिकाची लागवड केल्यास हेक्टरी ४०० झाडांची लागवड होऊ शकते. चांगली माती, पोयटा, शेणखत, रासायनिक खत सिंगल सुपरफॉस्पेट १/२ किलो प्रतिखड्डा व थायमेट १० जी बांगडी पध्दतीने वापरुन पावसाळ्यापूर्वी खड्डे भरुन घ्यावेत. जून, जुलैमध्ये पाऊस पडून जमिनीत भरपूर ओल झाल्यावर अंजिराची मुळे फुटलेली रोपे खड्ड्यात लावावीत. रोपावर भरपूर पाने फुटलेली असल्यास फक्त २ ते ३ पाने ठेवून बाकीची पाने खोडाला इजा न होता काढून टाकावीत. खड्ड्यात मधोमध रोप लावून पाण्याची चूळ द्यावी नंतर कलम रूजेपर्यंत तीन-चार दिवसांनी गरजेनुसार पाणी द्यावे.



**खते** : अंजिराच्या झाडांची नीट व जोमाने वाढ होण्यासाठी लागवडीच्या सुरुवातीच्या काळात नियमित खते द्यावीत. एक वर्षाच्या झाडाला साधारणपणे १ घमेले शेणखत व १०० ते १५० ग्रॅम अमोनियम सल्फेट पुरेसे होते. दरवर्षी हे प्रमाण वाढवीत नेऊन ५ वर्षे वयाच्या झाडांना ४ ते ५ घमेली शेणखत व १ किलो अमोनियम सल्फेट द्यावे. लहान झाडांना खते नेहमी पावसाळ्याच्या सुरुवातीला घालावीत नंतर मात्र मोठ्या झाडांना खते विश्रांतीचा काळ संपताना म्हणजे सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस द्यावीत. ५ ते ६ वर्षे वयाच्या झाडास ६०० ग्रॅम नत्र २५० ग्रॅम स्फुरद व २५० ग्रॅम पालाश दिल्याने फळे चांगल्या प्रतीची मिळतात.

**पाणीपुरवठा** : झाडाला फार पाणी लागत नाही. परत फळझाड वाढीच्या काळात हंगाम, जमिनीचा मगदूर व मशागतीचा प्रकार यानुसार जरुरीप्रमाणे नियमित पाणी द्यावे. झाड फळावर आल्यावर ऑक्टोबर ते मे महिन्यात नियमित पाणी द्यावे. जुलै व ऑगस्ट हा काळ झाडाच्या विश्रांतीचा असतो. फळे लागून वाढत असताना पाण्यात हयगय होऊ देऊ नये. कारण त्यामुळे फळांच्या आकारावर अनिष्ट परिणाम होतो.

फळे पिकू लागल्यावर मात्र पाणी अतिशय कमी म्हणून आळी नुसती ओली होतील एवढे द्यावे. कारण अधिक पाण्याने फळाची गोडी कमी होते. फळे तोडणे पूर्ण झाल्यावर झाडाचे पाणी बंद करावे.

**आंतरपिके** : आंतरपिके घेताना मूळ बागेची हेळसांड होता कामा नये व फळझाडांना आंतरपिकापासून उपद्रवही होऊ नये यासाठी आंतरपिकाची निवड फार महत्त्वाची ठरते. ही आंतरपिके कमी कालावधीची तर असावीतच शिवाय त्यांची मुळे खूप खोल जाणारी नसावीत. ताग, धैंचा वगैरेंसारखी हिरवळीची पिके, फरसबी- मटकी यासारखी द्विदल पिके घेतल्याने जमिनीची प्रत सुधारण्यास मदत होते. ज्यावेळी आंतरपीक घेतले जात नाही त्यावेळी बाग स्वच्छ ठेवणे हे तितकेच जरुरीचे आहे.

**बहार धरणे** : अंजिराला दोनवेळा फळ बहार येतो. पावसाळ्यात येणाऱ्या बहाराला खट्टा आणि

उन्हाळ्यात येणाऱ्या बहाराला मीठा बहार म्हणतात. खट्टा बहारातील फळे जुलै किंवा ऑगस्टमध्ये तयार होतात, परंतु ती अत्यंत बेचव असतात. त्यामुळे त्यांचा जेली, कोशिंबीर करण्याकरिता उपयोग केला जातो. मीठा बहारातील फळे मार्च, एप्रिलमध्ये तयार होतात. फळांचा दर्जा व उत्पन्न चांगल्या प्रतीचे मिळते व बाजारभाव सुध्दा चांगला मिळतो. त्यामुळे शेतकरी बांधवांनी या बहाराची खास काळजी घ्यावी. यासाठी सप्टेंबर महिन्यात एक उथळ नांगरट करुन एक-दोन आठवडे ताण द्यावा. मागील वर्षाच्या फांद्यांची पध्दतशीरपणे छाटणी करुन वर नमूद केल्याप्रमाणे खताची मात्रा द्यावी. यावेळी शेणखत स्फुरद, पालाश व नत्राचा निम्मा हप्ता द्यावा. वाफे किंवा आळी बांधून बागेस पाणी देणे सुरु करावे. झाडांची सुप्तावस्था संपून त्यांना पाणी आणि खतांचा पुरवठा होताच ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान झाडावर नवीन फूट व फळे वाढीस लागतात. फळांची वाढ चांगली होण्यासाठी नत्राचा उरलेला हप्ता नोव्हेंबरअखेर द्यावा. फळे वाढू लागल्यापासून फळे निघेपर्यंत पाण्याची उणीव भासू देऊ नये.



**फळांची काढणी** : दुसऱ्या वर्षापासून अंजिरास थोडी थोडी फळे येऊ लागतात. परंतु फळाचे उत्पादन झाडे योग्य प्रकारे वाढेपर्यंत घेऊ नये. चौथ्या वर्षापासून उत्पादन घेण्यास हरकत नाही. सात- आठ वर्षाची झाडे झाल्यावर उत्पादन चांगले येते. उत्तम काळजी, मशागत, खते दिली तर एका झाडापासून २५ ते ४० किलो फळे मिळतात. बहार धरल्यापासून १२० ते १४० दिवसांत फळे काढण्यास तयार होतात. फळ पक्व होताना फळावरील हिरवी छटा जाऊन फळ पिवळसर, लालसर व जांभळ्या रंगात दिसू लागते. पक्व फळ देठासह धारदार चाकूने कापून काढावे. दर दोन दिवसांनी फळतोडणी करावी. फळे लवकर तयार होणेसाठी केलेल्या प्रयोगांत ॲन्सिमिडाल २५० पीपीएम या प्रमाणात झाडावर फवारले असता फळे महिना ते सव्वा महिना आधी तयार होतात.

**अंजीर सुकविणे** : अंजीर सुकविण्यासाठी पूना अंजीर ही जात सर्वोत्कृष्ट आहे. उत्तम पिकलेली बिनडंखी अंजिराची फळे घ्यावीत. बाहेरुन बंद होणारी पेटी घेऊन त्यात काढता घालता येतील असे जाळीचे खण करुन घ्यावेत. जाळीवर पिकलेल्या अंजिराची फळे पसरावीत. पेटीच्या खालच्या खणात निखाऱ्याची शेगडी ठेवण्याची सोय करावी. धुरी देण्याचे वेळी जाळीवर फळे ठेवून निखाऱ्यावर गंधकाची पावडर टाकून पेटी बंद करावी. हे काम द्राक्षाला धुरी देण्याच्या चेंबरमध्येही करता येईल. धुरी देऊन झाल्यावर फळे पांढरी पडतात.

गंधकाची धुरी दिल्याने फळावरील बुरशी मरून जाते व तिचे पुढील कार्य थांबते. त्यानंतर धुरी दिलेली फळे पेटीच्या बाहेर काढून धूळ, कचरा येणार नाही अशा जागी सुकत ठेवावी. ५ ते ६ दिवसातच अंजीर सुकतात. एक किलो ओल्या अंजिरापासून ३०० ग्रॅम सुके अंजीर मिळतात. सुकलेल्या अंजिरांना गोलाकार आकार देऊन एक लिटर पाण्यात ३० ग्रॅम मीठ घातलेल्या मिश्रणात बुडवावे व नंतर पूर्ण सुकवून ठेवावे. ■